२८५२८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. २३५
REFBK-0010199
REFBK-0010199

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे यास सप्रेम भेट पां. पि. घरत
म. ग्रं. सं. ठाणें
विषय दे. प्रवास
वा. नं. २३५
२३३१८
अनुक्रम
क्रमांक २३५

# गोरखगड

## -अर्थात्-

# श्रीगोरक्षनाथाचें समाधिस्थान.

## ( देहरी )

**ता. मुरबाड, जि. ठाणें.**

REFBK-0010199

**पां. पि. घरत**

१०१९९

सन १९५८ ] [ किंमत ६ आणे

प्रकाशक—
श्री सोमनाथबुवा
गुरु गोरक्षनाथ कुटी,
मु० देहरी,
पो० मुरबाड, जि० ठाणें.

मुद्रक—
लक्ष्मीबाई नारायण चौधरी,
निर्णयसागर प्रेस, २६–२८
कोलभाट स्ट्रीट, मुंबई.

2374 नों: दि:

## मनोगत–

"जो पुरुष परकार्यें करण्यासाठीं स्वार्थाचा त्याग करतो, तो निश्च सर्व प्राण्याबरोबर अभेदपणानें वागतो. ज्याच्या हृदयांत स्वभावतःच औदार्याचा उत्तम महिमा स्फुरत असतो व जो आरंभलेलीं कार्यें करण्यास समर्थ असतो, असा अनिर्वचनीय गुणांचा पुरुष अतीव विजयी होतो."

सह्याद्रीच्या खोऱ्यांत वसलेल्या तळेखल तालुका मुरबाड सारख्या बिकट ठिकाणीं जर माझी बदली झाली नसती तर हें अंधारात असलेलें ठिकाण मला उजेडांत आणतां आलें नसतें. ज्या ठिकाणीं वाचावयास ताजें वर्तमानपत्र मिळणें कठिण आहे त्या ठिकाणीं माझ्या वाचनीय मनाची भूक मला धार्मिकग्रंथांवर भागवावी लागली. हे धार्मिक ग्रंथ वाचीत असतांच माझें नास्तिक मन नकळत आस्तिक बनलें व रोज संध्याकाळीं माझीं पाउलें गोरक्षनाथाच्या समाधिस्थानाच्या ठिकाणीं वळूं लागलीं. या ठिकाणाविषयीं मी बरीच माहिती गोळा केली: आणि मग येथील तपस्वी श्री. सोमनाथ बुवा" यांना या ठिकाणाची जनतेला अधिक माहिती व्हावी म्हणून पुस्तक लिहिण्याचें माझें मनोगत सांगितलें तेव्हां त्यानीं या गोष्टीला लगेच होकार दिला. निर्णयसागर प्रेसचे मालकानीं आमचें हस्तलिखित वाचून तें अल्प मोबदला घेऊन पुस्तक रूपानें छापून दिलें, हें त्यांचें आम्हांवर अमर ऋण झालें आहे. तसेच निर्णयसागर प्रेसच्या कारकुनांनीं वर्गणी रुपानें रु. ३० जमवून या पुस्तकाच्या छपाई साठी जी मदत केली त्याबद्दल व प्रेसचा कामगार वर्ग तसेंच इतर सहाय्यक या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें; म्हणूनच श्रीगोरक्षनाथ कृपाकटाक्षानें मी अद्वैतामृताचा स्वाद घेणारा झालों आहें, आपल्या कृपेनेंच अद्वैतात्मदर्शनाकडे माझ्या वृत्ती आकर्षण पावूं लागल्या आहेत,—त्यांत लीन होण्याची भावना होत आहे; आपण माझ्या नीरस हृदयक्षेत्रास ब्रह्मामृताच्या वृष्टीनें रसमय बनवून उपदेशद्वारा जीं परमार्थिक बीजें माझ्या हृदयक्षेत्रांत पेरीत होतां, ती कालक्रमानें नवपल्लवित झालीं आहेत. व ती आपलीच विभूती आहे. तीं बीजें आज मी आपल्या पवित्र चरणकमलीं शिष्यभावानें समर्पण करीत आहें. तीं आपण जेथें विराजमान असाल तेथें स्वीकारून मला कृतार्थ करा. भाविक जनहो! माझ्या हातून फुलांची ही पहिलीच ओंजळ आपल्या पदचरणीं पडत आहे ती गोड मानून घ्या हीच विनंती.

गुरु गोरक्षनाथ कुटी,
कार्तिक कृष्ण ११ शके १८७९
दि० १९–११–१९५७

आपला अनृणी शिष्य
**पांडुरंग पिलाजी घरत,**
साहित्यप्राज्ञ. खार्डी

# श्री. पां. पि. घरत यांचीं आगामीं पुष्पें

*
* *

( १ ) **समाजदर्शन**—( आगरी समाजाला मार्गदर्शन करणारें पुष्प )

( २ ) **भाग्य अपुलें**—( खेड्याचा उद्धार करणारी ग्रामीण कथा )

*( ३ ) **आमची ओळख**—भाग १ ला ( पाळीव पशू )

*( ४ ) **आमची ओळख**—भाग २ रा ( रानटी पशू )

*( ५ ) **आमची ओळख**—भाग ३ रा ( पाळीव व रानटी पक्षी )

( ६ ) **नवजीवन**—तीन अंकी नाटक

( ७ ) **तीन नाटिका**—( सरकारी योजनांचा पुरस्कार करणाऱ्या )

( ८ ) **तीर्थरूप ठाणें जिल्हा**—( ठाणें जिल्ह्यांतील प्रसिद्ध स्थळांचीं वर्णनें )

९) गोरक्षनाथ चरित्र -

**[ पां. पि. घरत मु. खार्डी, पो. दातिवरें, ता. पालघर, जि. ठाणें ]**

---

*ही तिन्ही पुष्पें लहान मुलांसाठीं असून मनोरंजन आहेत.

# गोरखगड
## अर्थात्
# श्रीगोरक्षनाथांचें समाधिस्थान

ठाणें जिल्ह्यांत जीं अनेक पुरातन क्षेत्रें अजून अंधारांत आहेत, त्यांपैकीं मुरबाड तालुक्यांत सह्याद्रि पर्वतांत असलेलें "गोरखगड" हें एक क्षेत्र आहे. मुरबाड या तालुक्याच्या ठिकाणापासून गोरखगडाचें अंतर सुमारें १४ मैल आहे. मुरबाड-पासून एस्. टी. नें नडई येथें उतरून ( नडई येथें मारुतीचें प्रसिद्ध देवालय असून श्रावण-भाद्रपद महिन्यांत दर शनिवारीं या ठिकाणीं भाविकांची गर्दी उसळलेली असते. ) भुवन, जामघर, विढें, तुळई, तळेखल वरून देहरी येथें यावें. हा मार्ग सुमारें ११ मैलांचा आहे. याच एस्. टी. नें शिवळा येथें उतरल्यास कोंडेसाखर, कोरावळा, विढें ते देहरी हा मार्ग सुमारें ८ मैलांचा व सरळगांव येथें उतरल्यास नागांव, माजगांव, कळंभें ते देहरी हा मार्ग सुमारें ६ मैलांचा आहे. शहापूर कडील प्रवाशांना हाच मार्ग सुकर आहे. पुणें जिल्ह्यांतील लोकांना नाणेंघांटानें पळू–सोनावळें–धसई मार्गानें देहरीस येतां येईल. नगर जिल्ह्यांतील लोकांना आवफ्याच्या घांटांतून खोपीवलीवरून देहरीस येतां येईल व कुलाबा जिल्ह्यांतील व भीमाशंकरकडून येणाऱ्या लोकांना बलिवरें, जामुर्डे, खानिवरें, नारिवली, उचले, तळेखल वरून देहरीस येतां येईल. हा सर्व प्रवास पावसाळ्यांत पायींच करावा लागतो. उन्हाळ्यांत बैलगाड्या मिळूं शकतात. अशा रीतीनें देहरी येथें आल्यावर गोरखनाथाची कुटी दिसते. ही कुटी १९५३ मध्यें येथील तपस्वी श्री. सोमनाथबुवा यांनीं लोकवर्गणी व श्रमदान यांच्या मदतीनें बांधली आहे. ज्या ठिकाणीं कुटी बांधली आहे त्या ठिकाणीं गोरखनाथांनीं शके दहाशेंमध्यें माघ शुद्ध पौर्णिमेस समाधि घेतली आहे. त्यांच्या पादुका याच ठिकाणीं सांपडल्या. त्या अजूनही कुटींत जपून ठेवल्या असून भाविक लोक रोज त्यांचें मनोभावें दर्शन घेतात. या ठिकाणाविषयीं अशी कथा आहे कीं–मच्छिंद्रनाथ व गोरखनाथ सौराष्ट्रांतून निघाले ते मार्ग क्रमीत तैलंगणांत आले. तेथें त्यांनीं गोदेचे संगमीं स्नान करून श्रीशिवाचें पूजन केलें. पुढें आवढ्या-नागनाथवरून परळीवैजनाथ आदि तीर्थें केल्यावर महारण्यांत ( महाराष्ट्रांत ) गर्भागिरी पर्वतावर ( हल्लीं हा पर्वत आजा पर्वत या नांवानें ओळखला जात असून त्याला बरेंच महत्त्व आलें आहे ) जें वाल्मीक ऋषींचें स्थान आहे तेथें आले. हें अरण्य महाभयंकर, वाट देखील धड उमगेना, अशा त्या घोर अरण्यांतून प्रवास

करण्याचा प्रसंग आल्यामुळें मच्छिंद्रनाथ भिऊन गेले. त्याच्या भिण्याचें कारण असें होतें कीं–स्त्री राज्यांतून येतांना त्यांनीं आपल्या झोळींत गुपचुप लपवून एक सोन्याची वीट आणली होती.

रस्त्यांत कदाचित दरोडेखोर आपलीवीट हिसकावून घेतील या भीतीनें ते गोरक्षास मार्गांत चालत असतांना विचारीत कीं–"ह्या घोर अरण्यांत चोरांची धास्ती तर नाहीं ना ?" हें ऐकून आपल्या गुरुला चोराची भीति कशासाठीं वाटत आहे ही कल्पना गोरक्षनाथाच्या मनांत उत्पन्न झाली. गुरूजवळ कांहींतरी वित्त असलें पाहिजे. तें ते चोर लुटून नेतील ही भीति त्यांच्या मनांत वाटत असावी असा त्यांनीं तर्क केला. व हें भय निरसन होण्याचा उपाय योजावा असा मनांत विचार करून तो कांहींही उत्तर न देतां तसाच मुकाट्यानें गुरूमागें चालत होता. इतक्यांत त्यास एक पाण्याचें ठिकाण दिसलें. मच्छिन्द्रनाथानें गोरक्षनाथास अंमळ थांबावयास सांगितलें व आपली झोळी त्याचेजवळ देऊन ते शौचास गेले. तेव्हां गोरक्षनाथानें गुरूच्या झोळींत पाहिलें तों सोन्याची वीट दिसली. तेव्हां हेंच भीतीचें मूळ असें जाणून त्यानें ती वीट फेंकून देऊन तिच्याच वजनाचा एक दगड झोळींत भरून ठेवला व आपण चालूं लागला. मच्छिंद्रनाथही मागून तांतडीनें शौचाहून आल्यानंतर चालूं लागले. गोरक्षनाथ बराच लांब गेल्यावर गुरु मागून येत होते त्यांची वाट पहात विसांवा घेत बसला. इतक्यांत एक विहीर त्याचे नजरेस पडली. तींत त्यानें स्नान केलें, मीननाथास स्नान घातलें व नित्यकर्मे उरकून घेत आहे तोंच मच्छिंद्रनाथ जवळ आले आणि पूर्ववत येथून पुढें कांहीं भय वगैरे नाहीं ना ? असें विचारूं लागले, तेव्हां गोरक्षनाथ म्हणाले. "भीतीचें आतां कारणच उरलें नाहीं, भीति त्या ओहळावरच राहिली." तेव्हां मच्छिंद्रनाथ आश्चर्यचकित होऊन त्यांनीं आपली झोळी पाहिली. झोळींत सोन्याच्या विटेऐवजीं दगड दिसला. दगड पाहून मच्छिंद्रनाथांना फार दुःख झालें. त्यांनीं गोरक्षनाथाजवळ वीट परत मिळण्याचा हट्ट धरला. तेव्हां गोरक्षनाथ आपल्या गुरूला घेऊन आजापर्वताच्या शिखरावर गेले. तेथें गोरक्षनाथांनीं सिद्धिमंत्र जपून लघवी केली. तों काय चमत्कार! सारा पर्वत सुवर्णमय झाला. मग गोरक्षनाथ आपल्या गुरूला म्हणाले, आतां तुम्हांला हवें तितकें सुवर्ण घ्या! त्यावर मच्छिंद्रनाथ म्हणाले, "तुझ्या सारखा शिष्य असल्यावर मला यत्किंत वीट घेऊन काय करावयाचें आहे?"

२०११

## "श्रीसोमनाथबुवा"

येथून जवळच असलेल्या उचले या गांवीं श्री. बाळ पाटील यांच्या पोटीं श्री. सोमनाथ बुवा यांचा जन्म झाला. त्यांची आई श्री. काळूबाई ही ईश्वर भक्त असल्यामुळें साहजिकच श्री. सोमनाथबुवा यांचा ओढा भक्तिमार्गाकडे वळला. ते गोरक्षनाथाची भक्ति मनोभावें करीत असत. त्यामुळें श्री. गोरक्षनाथांनीं त्याच्या स्वप्नांत येऊन पादुकांच्या ठिकाणीं देऊळ बांधून यात्रा भरविण्याचें सूचविलें त्याप्रमाणें पा. म. सावंत ( रा. रत्नागिरी ) व बुवानीं आसपासच्या लोकांच्या मदतीनें गोरक्षनाथाच्या पादुकांच्या ठिकाणीं कुटी बांधून घेतली व यात्रा भरविण्यास सुरवात केली. श्री. दुंदाजी भाऊ बांगर (रा. नारवळ) यांनी या कुटीसाठीं व भिवंडीचे श्री. दांडेकर यांनीं एक हजार कौलें फुकट दिलीं. श्री. नामदेव तुकाराम गुढदे रा. कल्याण यांनीं ५१ रु. रोख दिले. याप्रमाणें अनेक भक्तांनीं यथाशक्ति मदत केली. पालखी काढण्याचा हक्क देहरी ग्रामस्थांचा आहे. श्री. सोमनाथबुवा हे हल्लीं संन्यासाश्रमी असून ते मनोभावें पादुकांची पूजा करण्यासाठीं कुटींतच रहात आहेत. कुटीजवळच त्यांनीं पिण्याचें पाणी मिळण्यासाठीं विहीर खोदण्याचें काम चालू केलें आहे. या कुटीपर्यंत बैलगाडी जाऊं शकते.

---

चित्रसेन गंधर्वास सर्व वृत्तांत कळविला व त्याच्या अनुमतीनें एक पत्र लिहविलें, तें त्यानें सुरोचन नामक गंधर्वाजवळ दिलें व इकडील सविस्तर मजकूर सांगितला. मग तो ब्राह्मण मोठ्या आनंदानें मुलांस व गहिरीनाथास घेऊन निघाला. तो मजल दर मजल करीत गर्भाद्रि पर्वतावर ( आजा पर्वत ) येऊन पोहोंचल्यावर त्यानें गहिरीनाथास मच्छिंद्रनाथाच्या पायांवर घातलें.

त्यावेळीं शंकरानें मच्छिंद्रनाथास सांगितलें कीं आम्हांस पुढें अवतार घ्यावयाचा आहे. त्यावेळीं मी निवृत्ति नावानें प्रसिद्धीस येईन. व मला गहिनीनाथ अनुग्रह करील. यास्तव यास अनुग्रह देऊन सकल विद्यांमध्यें प्रवीण करावें. हें ऐकून मच्छिंद्रनाथानें गोरक्षनाथाकडून गहिनीनाथास लागलाच अनुग्रह देवविला. तसेंच संपूर्ण देवांच्या समक्ष त्याच्या मस्तकावर आपला वरदस्त ठेविला. हा समाराधनेचा समारंभ एक महिनाभर सतत चालला होता. मग गोरक्षानें कुबेरास सांगितलें कीं— तूं हा सुवर्णाचा पर्वत घेऊन जा आणि त्याचा मोबदला आम्हांस अमोल वस्त्रें, भूषणें दे; म्हणजे तीं सर्व मंडळींस देऊन रवाना करतां येईल. हें भाषण ऐकून कुबेरानें उत्तर दिलें कीं—"येथील धन इथेंच राहूं द्या. आज्ञा कराल त्याप्रमाणें वस्त्रालंकार

मी घेऊन येतों. मग त्यानें वस्त्रांचीं दिंडें व तऱ्हे तऱ्हेचे अलंकार आणून दिले. तीं वस्त्रभूषणें, सर्वांना दिलीं; याचकांना द्रव्य देऊन सर्वांच्या इच्छा तृप्त केल्या. व मोठ्या सन्मानानें सर्वांची रवानगी केली.

नंतर कुबेरानीं अदृश्य शास्त्राची योजना करून त्यांनीं सुवर्णाचा वर्ण झाकून टाकला त्यामुळें सारा पर्वत काळा झाला. शंकर मात्र याच पर्वतार राहिले. याच पर्वताला 'म्हातारदेव' म्हणजेच आजापर्वंत असें म्हणतात. त्याच्या पश्चिमेस कानिफा राहिला त्यानें त्या गांवाचें नांव 'मढी' असें ठेवलें. त्याच्या दक्षिणेस मच्छिंद्र नाथानें वसतिस्थान केलें. त्याच्या पूर्वेस जालंदरनाथ राहिला त्याच पर्वताच्या पलीकडे वडवानल गांवीं नागनाथानें वसतिस्थान केलें. विटे गावांत रेवणसिद्ध राहिला. गर्भाद्रिपर्वतावर वामतीर्थीं (म्हणजेच आजचा गोरखगड पर्वत) गोरक्षनाथ राहिला. त्यानें तिथेंच गहिनीनाथाकडून विद्याभ्यास करविला. व गहिनीनाथाची विद्या पूर्ण होतांच त्यांनीं त्याच ठिकाणीं शके दहाशें या वर्षीं समाधी घेतली.

कबीराच्या घाटाच्या (हल्लींचा मालशेत घाट) समाधि बांधण्याचा मुख्य मुद्दा हाच होता कीं पुढें यवन राजांपासून उपद्रव होऊं नये. एकदां औरंगजेब बादशहानें या समाधी कोणाच्या आहेत हें विचारल्यावरून लोकांनीं त्यांस सांगितलें कीं–"तुमच्या पूर्वजांच्या आहेत. मठांत, कान्होबा, पार्वती, मच्छिंद्र, त्यांच्या पूर्वेस जालंदर, त्याच्या पलीकडे गहिनीनाथ असें ऐकून त्यानें तीं नांवें पालटून दुसरीं नांवें ठेवलीं तीं अशीं—जालंदरास जानपीर, गहिनीनाथास गैरीपीर, मच्छिंद्रनाथास मायबाप लोण, असीं नावें ठेवलीं. कल्याण कलियोग बाबसैतन्य यांची समाधी होती त्याला रावबहागशेर असें नांव ठेवलें व तेथें यवन पूजारी ठेवले. गोरक्षनाथाजवळील कळंभें इथील टेकडीवर एक पीर आहे, देहरी येथें ही एक पीर आहे. त्यांना सरकारकडून मदत मिळत होती, परंतु अलीकडे ही मदत बंद झाली आहे. या भागाची पोलीस पाटीलकी आजही मुसलमानाकडे आहे आणि त्यांना वतनी जमिनीही देण्यांत आल्या आहेत. यावरूनही औरंगजेब या भागांत आला होता हें सिद्ध होत आहे. [नवनाथ कथासार अध्याय २३ वा.]

या कुटी पासूनच गोरख गडाची चढण सुरू होते. घनदाट वनश्री विविधवेल आणि त्या वेलांवर रंगीबेरंगी फुलें अशा आनंददायक, रस्त्यानीं गडाची चढण सुरू होते. चढण चढतांना सरस्वतीच्या वाहनाचा एकादा कळप, श्रीरामचंद्रप्रभूंच्या सेनेचे शिपाई

अथवा कालिका मातेचें प्रिय वाहन ह कूच पुढें जातांना दिसतें. कुटीपासून सुमारें १॥ मैलावर गोरख गडाचा पाया लागतो. या ठिकाणीं पेशवाईच्या काळांतील घरांचे जुने नमुने पहावयास मिळतात. शेजारींच एक कुंड आहे. या कुंडांत बाराही महिने गार पाणी असतें. घरांच्या या चौथऱ्यांत हल्लीं आम्रवृक्ष आपलें साम्राज्य करीत असल्यामुळें येथील हवा फारच शीतल आहे. येथूनच पूर्वेस सुमारें ३ फर्लांगावर भवानी मातेचें देऊळ आहे. या देवीचें पूर्वीचें नांव कालिका देवी असें असून ती शंकराची भक्त होती. ती या गडावर कशी आली. या बाबत अशी हकीकत आहे कीं—बारा मल्हार पवित्र स्थानीं मच्छिंद्रनाथानें अष्टभैरवादिकांची खात्री करून देवीचा प्रसाद मिळविला. नंतर कुमार दैवततीर्थ करून कोंकणांत कुडाळ प्रांतांत अधगूळ गावांत येऊन राहिला. त्या गांवाबाहेर महाकालिका दैवत आहे. त्या दैवताच्या दर्शनाकरितां मच्छिंद्रनाथ गेला. तें कालिका दैवत अति खडतर असून शंकराच्या हातांतल्या कालीशास्त्राची येथें स्थापना केली आहे. शंकराच्या वरदानानेंच कालिका अंबेच्या स्थापनेनें येथें विश्रांति घेत होती. ह्या देवीच्या दर्शनासाठीं मच्छिंद्रनाथ देवळांत गेले व देवीचें दर्शन घेऊन त्यांनीं प्रार्थना केली कीं—"मातोश्री! मी मंत्र काव्य केलें आहे त्यास तुझें सहाय्य असावें. आणि माझ्या हातांत राहून माझी कवित्व विद्या गौरवून वरदान देऊन तूं उदयास आणावी." मच्छिंद्रनाथाची ही प्रार्थना कंटाळलेल्या देवीला आवडली नाहीं. ती रागानें म्हणाली–"तूं कवित्वविद्या निर्माण करून माझ्या जवळ वरप्रदान मागत आहेस पण तेणें करून मला तूं विघ्न करावयास आला आहेस. मी शंकरांच्या हातांतील अस्त्र मिळविलें तें तुझ्या हातांत देण्यासाठीं नाहीं. आतां तूं निमुट पणें येथून चालता हो नाहींतर प्राणास मुकशील. देवीचें हें भाषण ऐकून मच्छिंद्रनाथ म्हणाला–"मी प्राणास मुकेन ही गोष्ट तूं स्वप्नांत सुद्धां आणूं नकोस. सूर्यबिंब अगदीं लहान दिसतें परंतु तें त्रिभुवन प्रकाशित करतें. त्याप्रमाणें मी आतां माझा प्रताप दाखवून तुला क्षणांत वश करून घेतों पहा. तेव्हां अंबा म्हणाली–भ्रष्टा! तूं कान फाडून हातांत कंकण घालून व कपाळास शेंदूर लावून येथें येऊन मला भिववीत आहेस पण मी या तुझ्या धमकावणीला भिणार नाहीं. अरे! तुझी उत्पत्ति मला ठाऊक आहे, बोलून चालून तुझा बाप कोळी. तूं मासे मारून निर्वाह करावयाचा तें सोडून दिलेंस! तुला दरिद्र्याला ही अस्त्रविद्या कशाला पाहिजे? तुला वाटत असेल कीं ही विद्या संपादन करून मी भूतलाला वश करीन, पण मी तें तुला साध्य करूं देणार नाहीं हें तूं पक्कें समज. किंचित वाकडी नजर

करीन तर हें ब्रह्मांड पालथें घालून लोळवून टाकीन." तेव्हां मच्छिंद्रनाथ म्हणाला–देवी! मी सांगतों ऐक "बळी वामनाला मशका समान समजत होता. परंतु त्याला परिणामीं पाताळ लोक पहावा लागला" हें भाषण ऐकून देवीस फारच राग आला. ती त्यास म्हणाली–तुझ्यामध्यें कोणता प्रताप आहे तो मला आतांच दाखीव. तेव्हां मच्छिंद्रनाथ म्हणाला–तूं शंकरांच्या हातामध्यें राहून मोठमोठाले पराक्रम केल्याचे दिमाख मला दाखवीत आहेस. तर तो तुझा प्रताप आतां मला दाखव.

मच्छिन्द्रनाथांचें हें भाषण ऐकून भद्रकाली सिंहासारखी आरोळी मारून आकाशांत प्रकट झाली. इतक्यांत भयंकर शब्द येऊं लागले कीं 'जोगड्या' आतां आपला प्राण वाचव. तूं आपल्या गुरूचें स्मरण कर. कारण वज्रास्त्रानें जसा पर्वताचा चुराडा होतो, तसा तुझ्या मुळें पृथ्वीचा होईल. अरे ही कालिका आज पृथ्वी सपाट करून टाकण्यास तयार झाली आहे. आंता तुझा निभाव कसा लागेल? अशीं बरींच भाषणें ऐकून घेतल्यावर मच्छिंद्रनाथ देवीस म्हणाला तूं पाहिजे तशी बोललीस तरी तुझ्या पासून माझें कांहींच वांकडें व्हावयाचें नाहीं, असें म्हणून त्यानें भस्म हातांत घेतलें व वासवशक्ति मंत्र जपून तें भस्म आकाशांत फेंकून दिलें. तेव्हां ती दैदीप्यमान वासवशक्ति तत्काळ प्रकट झाली. सूर्याच्या हातचें वासवास्त्र आणि शंकराच्या हातचें भद्रकाली किंवा कालिका अस्त्र या उभयतांचें युद्ध सुरू झालें. दोन्हीं अस्त्रांची झोंबी लागून तीं एकमेकावर प्रहर करीत होतीं. झगडतां झगडतां शेवटीं कालीनें वासवशक्तीचा पाडाव केला. आणि मोठ्या आवेशानें ती मच्छिंद्रावर चालली. हें नाथाच्या लक्षांत येतांच त्यानें पुन्हां भस्म घेऊन एकादश रुद्रमंत्र प्रयोग सिद्धकरून फेकतांच एकादशरुद्र प्रकट झाले. ते भयंकर व अनिवार प्रलय करणारे रुद्र प्रकट होतांच कालिकेचें तेज फिकें पडलें. तिनें सर्वांस नमस्कार करून भक्तिपूर्वक स्तुति केली. तेव्हां ते सौम्य झाले. असें पाहून मच्छिंद्रनाथानें वज्रास्त्र, धूम्रास्त्रही सोडलें; परंतु त्याचें कांहींच वर्चस्व होईना. कारण कालिकेनें धूम्रास्त्र गिळून टाकलें. आणि वज्रास्त्र शैलाद्री (सह्याद्री) पर्वतावर आपटलें. त्यामुळें तो पर्वत फुटून गेला. या प्रमाणें दोन्हीं अस्त्रांची पडती पाहून मच्छिंद्रनाथानें पुन्हा वाताकर्षणास्त्राची योजना केली, त्या वातास्त्राची मख्खी त्यास पक्की साधून गेली होती. दत्तात्रेयाच्या कृपाप्रसादानें मच्छिंद्रनाथास वाताकर्षणास्त्राचा मोठा लाभ झाला होता. तें अस्त्र सिद्ध करून प्रेरितांच त्यानें कालिकादेवीवर प्रवेश केला. तेव्हां देहाचें चलनवलन बंद होऊं लागलें. इतक्यांत

नों. दि.

देवी विकल होऊन गगनावरून जमीनीवर धाडकन आदळली व बेशुद्ध होऊन पडली. हें पाहून देव दानवांना सुद्धा मोठा विस्मय वाटला. देवी ज्या ठिकाणीं आदळली तें टिकाण म्हणजेच आजचें भवानीचें देऊळ होय. ]

कालिकेचे प्राण जाऊं लागले तेव्हां तिनें शंकरांचें स्मरण केलें. तें ऐकून शंकर नंदीवर बसून लागलेच त्या ठिकाणीं आले. शंकरांस पाहून मच्छिंद्रनाथानें त्यांच्या पायांवर मस्तक ठेविलें, मग शंकरानीं त्यांस दाही हातांनीं पोटाशीं धरून कडकडून भेट दिली. व प्रताप दाखवून अस्त्र जिंकल्या बद्दल त्याची प्रशंसा केली. तेव्हां नाथानें शंकरांस सांगितलें कीं बदरिकाश्रमास तुम्हीं प्रसन्न होऊन दत्तात्रेयाकडून मला मंत्र-अस्त्रविद्यादि सर्व शिकविलें तो हा सर्व तुमच्या कृपेचा प्रताप होय. त्यावर शंकरानीं म्हटलें, तूर्त तें असो. तूं प्रथम कालिका देवीस सावध कर. तेव्हां नाथ म्हणाला, तुम्हीं आपला वरदहस्त माझ्या मस्तकावर ठेवा. हें ऐकून तुला कोणती इच्छा आहे असें शंकरानें विचारल्यावर त्यानें मागणें मागितलें कीं "जशी शुक्राचार्यानें संजीविनी विद्या कचास दिली, त्याचप्रमाणें साबरी विद्येचें तूं मजकडून कवित्व करविलेंस तसा वर देऊन मला कालिकास्त्र यावें व तुझ्या हातीं राहून कालिकेनें जशीं असंख्य कार्यें केलीं तशींच तिनें माझ्याहातीं राहून करावीं. व पुढेंही मंत्र कार्यांत तिनें उपयोगी पडावें, तेव्हां शंकर म्हणाले "तूं कालिकेस जीवदान देऊन उठव. तिला मी सर्वस्वी तुझ्या स्वाधीन करतों. व मी देखील तुला सर्व प्रकारें अनुकूल आहें." असें वचन मिळतांच मच्छिंद्रनाथ शंकरांच्या पायां पडला. मग वातास्त्र मंत्र म्हणून भस्म फेंकून वाताकर्षण अस्त्र काढून घेतलें. तेव्हां देवी सावध होऊन उठून बसली, इकडे तिकडे पाहूं लागली. तों शंकरास तिनें पाहिलें. मग ती झटकन येऊन त्याच्या पायां पडली व प्रसंगीं कैवार घेऊन प्राण वाचविले वगैरे बोलून तिनें त्याची स्तुति केली.

मग शंकरानें तिला सांगितलें कीं माझें एक तुजपाशीं मागणें आहे तेवढेंच तूं या वेळेस कृपा करून मला दे. तेव्हां कोणता हेतु आहे म्हणून देवीनें शंकरांस विचारल्यावर त्यानें सांगितलें कीं "माझ्या हातांत तूं बहुत दिवस राहिलीस, पण आतां तूं जगाच्या उपकारासाठीं मच्छिंद्रनाथांस साह्य व्हावें हें माझें मागणें कृपाकरून तूं कबूल कर" हे ऐकून देवीला हसूं आलें. ती म्हणाली मी तुमच्या पायांची दासी आहें; असें असतां आर्जव केल्यासारखें करून मजजवळ दान मागतां तें काय ? मला तुमची आज्ञा प्रमाण आहे. जिकडे पाठवाल तिकडे मी

जाईन. मग तिनें मच्छिंद्र नाथास बोलाविलें. तो येतांच देवीनें त्याला आलिंगन दिलें. व सर्वस्वी तुला साह्य आहें असें वचन देऊन त्याचें तिनें समाधान केलें. सर्वांना आनंद झाला. या आनंदाच्या भरांत शंकरांनीं दोघांना आशीर्वाद दिला व ते कैलासास निघून गेले.

वज्रास्त्रानें पर्वताचा चुराडा झाला. त्या चुराड्यांतूनच दोन मोठीं घुमटाकार शिखरें व एक लहान शिखर निर्माण झालें. या शिखरांपैकीं सर्वांत मोठ्या शिखरावर मच्छिंद्रनाथ वास्तव्य करूं लागले. या शिखरांवर आजपर्यंत कोणासही जातां आलें नाहीं. दुसऱ्या शिखरावर गोरक्षनाथ वास्तव्य करूं लागले. तिसऱ्या शिखरावर मीननाथानें वास्तव्य केलें. या सर्व शिखरांच्या पायथ्याशीं मध्यवर्ती ठिकाणीं कालिकेनें आपलें वास्तव्य केलें. तीच आज भवानी नांवानें ओळखली जात आहे. भवानीच्या देवळाच्या पूजा अर्चेचा सर्व हक्क खोपीवली या गांवाकडे आहे. देवीच्या दारांत एक भला मोठा नंदी असून शंकराच्या अनेक पिंड्या आहेत. अंगण असलेलें नागचाफ्याचें झाड बाराही महिने नंदीवर फुलें ठेवीत आहे. या देवीला भाविक लोक आजही मनोभावें भजत आहेत.

आतां गोरक्षनाथाच्या निवासस्थानाकडे वळूं. वर सांगितलेल्या सपाट जागेपासून गोरक्षगडाच्या चढणीला खरी सुरवात होते. नागमोडीच्या चढणीनें सुमारें पाऊण फर्लांगवर गेल्यावर एक भला मोठा दरवाजा लागतो. हा दरवाजा पेशवाईंत बांधला असावा. दरवाज्याचे अवशेष आज शिल्लक नाहींत. परंतु दरवाजाची चौकटी मात्र अजून शिल्लक आहे. या ठिकाणीं सुमारें ३० चौरस फूट सपाट जागा असून दोन बाजूला खोल दरी व एका बाजूला गोरक्षगडाचें उंच शिखर. यामुळें मूळ दरवाज्याशिवाय या ठिकाणीं येण्यास दुसरा कोणताच मार्ग नाहीं. ह्या ठिकाणावरही एक चाफ्याचें विस्तीर्ण झाड आहे. येथून गोरक्षगडाच्या शिखरावर चढण्यास पायऱ्यांची सुरवात होते. येथून ४५० पाय-या वर चढून गेल्यावर गडाचा मध्यभाग पूर्ण होतो. या ठिकाणीं एक भला विस्तीर्ण मंडप कोरला असून त्या मंडपाला दोन खांब आहेत. सुमारें ५०० ते ७०० माणसें बसूं शकतील इतका हा मंडप मोठा आहे. याला गोरक्षनाथाचा मंडप असें म्हणतात. मंडपाच्या पुढें चौदा हौद आहेत. या पैकीं सात हौद बाराही महिने थंडगार पाण्यानें भरलेले असतात, व सात हौद बाराही महिने रिकामे असतात. भर पावसाळ्यांतही हे हौद रिकामेच असतात. ही एक ईश्वरी लीलाच होय. रोगपीडित लोक आपला

१३ 2339६ दि. ५/१.७ 2414 नों दि. ........

नाहींसा करण्यासाठीं या ठिकाणीं येऊन वास्तव्य करतात व आपलें आरोग्य रून घेतात. या ठिकाणची दुसरी एक खरी गोष्ट आहे ती अशी कीं:—एकदां ासपासचीं सुमारें ५०।७५ माणसें या शिखरावर गेलीं. वर गेल्यानंतर त्यांना भूक लागली म्हणून त्यांनीं तेथील बुवा जवळ थोडे तांदूळ मागून या सभामंडपांत जेवण केलें. आश्चर्याची गोष्ट ही कीं बुवानीं दिलेल्या सव्वा शेर तांदळानीं हीं सर्व माणसें पोटभर जेवलीं अशाच तऱ्हेचीं अनेक सत्य उदाहरणें आसपासचे लोक सांगतात आणि तीं खरींही आहेत. याच मंडपाच्या पश्चिमेस एका गुहेंत श्रावण बाळ आपल्या आईबापास कावडींत घालून जात असल्याची कोरीव मूर्ती आहे. त्या बद्दलची दंतकथा अशी आहे कीं:—श्रावण बाळ आपल्या मातापितरांना कावडींत घालून काशीस जात होते. ते या रस्त्यांतून जात असतांना त्यांच्या आईबापांना तहान लागली. म्हणून त्यांनीं आपल्या आईबापांस वाघापासून त्रास होऊं नये म्हणून या गुहेंत ठेवलें आणि तो जवळच असलेल्या आवफ्याच्या तलावांत पाणी आणण्यासाठीं गेला (याच ठिकाणीं सह्याद्रीच्या माथ्यावर आवफ्याचा मोठा तलाव आहे.) परंतु तेथेंच तो दशरथाच्या बाणाला बळी पडला. आणि पुत्र शोकानें श्रावणाचे आईबाप या ठिकाणीं गत प्राण झाले. त्यांची आठवण कायम रहावी म्हणून ज्या ठिकाणीं श्रावणानें कावड ठेवली होती त्या ठिकाणीं दशरथानें श्रावण आपल्या आईबापाला कावडींत घालून नेत आहे असें चित्र कोरून ठेवलें. तेंच हें चित्र आहे असें म्हणतात.

आतां ह्या मंडपापासून गोरक्षगडाच्या माथ्यावर जाण्यासाठीं ५०० पायऱ्या वर चढावें लागतें. ही चढण आधुनिक पद्धतीच्या जिन्याप्रमाणें आहे. गोरखगडाच्या घुमटाकार (माथ्यावर) चढण्यासाठीं ह्या पायऱ्या मुद्दाम कोरलेल्या आहेत. साधारण २५० पायऱ्यांवर थोडी मोकळी जागा असून त्या ठिकाणीं एक हौद आहे. या हौदांत पाणी थंडगार असून तें पिण्यास उत्तम असतें. २५० पायऱ्या वर चढल्यावर थकलेल्या मानवाला विश्रांति मिळावी म्हणून ही सोय करण्यांत आली आहे. या ठिकाणीं पूर्ण विश्रांति घेतल्यावर भक्तजन पुढच्या पायऱ्या चढावयास लागतात. जशीं मांजरें भिंतीला चिकटून वर जातात त्याचप्रमाणें या पायऱ्या चढतांना भक्त जनांची अशी स्थिति होते. अनेक कष्ट केल्याशिवाय देव भेटत नाहीं. तसेंच या ५०० पायऱ्या चढल्या शिवाय शिवाचें दर्शन होत नाहीं. अशा ह्या अवघड पायऱ्या चढून वर आल्यावर सुमारें १०० चौरसफूट मोकळी जागा आहे.

या जागेंत माघ महिन्यांत हिरवें गार व नयन मनोहर गवत असून ही जागा रानफुलांनीं बहरलेली असते. हीं विविध फुलें पाहिलीं म्हणजे सृष्टिदेवीनें रंगी बेरंगी फुलांचा गालिचा पांघरला आहे असेंच मनाला वाटतें. या सपाट जागेच्या मध्यवर्ती एका औदुंबराच्या झाडाजवळ शंकराची पिंडी आहे, शेजारी बेलाचें झाड असून नागचाफ्याचेंही झाड आहे. ह्या बेलाचीं पानें व नागचाफ्याचीं फुलें रात्रंदिन शंकराच्या पिंडीवर पडत असतात. भाविक लोक याच पिंडीचें मनोभावें दर्शन घेतात.

या सपाट जागेपासून सभोवतालीं नजर फेकली असतां आसपासची वनश्री डोळे भरून पहावयास मिळते. जमीनीपासून सुमारें १५०० फूट उंचावर असलेली ही सपाटी जमीनीकडे नजर फेकतांना माणसाच्या मनांत भीती निर्माण करते. पण गोरक्षनाथ लगेच म्हणतात भिवूं नका. तुमचा पाठीराखा मी येथें तयारच आहें. सुदैवाची गोष्ट ही कीं, अशा ह्या अवघड मार्गांनी प्रवास करूनही आजपर्यंत एकही भक्त या प्रवासांत अपघाती ठरला नाहीं.

कार्तिकी एकादशी, व महाशिवरात्रि या दिवशीं आंघोळीसाठीं व दर्शनासाठीं आसपासचे हजारो लोक या ठिकाणीं येत असतात. माघशुद्ध पौर्णिमेस तर गोरक्षनाथाची यात्रा भरते. या यात्रेसही हजारो भाविक लोक येत असतात. देहरी, उचले, तळेखल येथील लोक देवाची पालखी काढतात, दुसऱ्या दिवशीं सकाळीं कुस्त्या होतात. लांबून येणाऱ्या यात्रेकरूंना येथील श्री. सोमनाथबुवा ग्रामस्थांच्या मदतीनें भोजन देत असतात. हें अन्नसत्र तीन दिवस चालतें. अशा रीतीनें या ठिकाणाला पुरातन कालापासूनच फार महत्त्व आलें आहे. यात्रा भरण्याची प्रथा येथील पोलीस हवालदार श्री. पांडुरंग महादेव सावंत रा. जाकी मिर्या. जि. रत्नागिरी. यांनीं या ठिकाणीं ड्यूटीवर असतांना सुरू केली. ते गोरक्षनाथाचे भक्त असल्यामुळें श्रीगोरक्षनाथाच्या आज्ञेनेंच श्री. सोमनाथबुवा व श्री. सावंत व देहरी मंडळी यांच्या सहाय्यानें यांनीं या ठिकाणीं यात्रा भरविण्यास सुरवात केली.

श्रीगोरक्ष नाथाच्या ठिकाणाचें महत्व माझ्या अल्पविचार सरणीनें जें अल्प चरित्र लिहिलें तें त्यांच्याच चरणीं समर्पण करून भक्तांची रजा घेतों.

श्री गोरक्षनाथ महाराज की जय.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—

(१) श्री. सोमनाथबुवा, गुरुगोरक्षनाथ कुटी, मु० देहरी, पो० मुरबाड, जि० ठाणें

(२) श्री. इब्राहीम व्ही० मेमन, किराणा मर्चंट, मु० देहरी, पो० मुरबाड जि० ठाणें

(३) शा. भिकूलाल नगीनदास, स्टेशनरी ॲण्ड कटलरी मर्चंट, मुरबाड जि० ठाणें

(४) श्री. यशवंताग्रज. C/o ज. मु. घरत मु० पो० दातिवरें ता० पालघर जि० ठाणें

(५) सौ. शांता तलारवार, बालसेवा प्रकाशन श्रीसदन-अचलेश्वर चांदा (विदर्भ)

(६) गंपावार बुकडेपो चांदा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
क्र. १०९९
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम वि:
क्रमांक नों: दि: